दै. लोकमत दि. 09.04.2020

लोकमत दि. 09.04.2020

# बनावट औषधींचा साठा जप्त

## गुन्हे शाखेची कारवाई : केळी मार्केट भागात दुकानावर छापा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** बेकायदेशीररित्या नशा आणि सेक्स वाढविणाऱ्या बनावट औषधींचा साठा स्थानिक गुन्हे शाखेने पकडला आहे. केळी मार्केट परिसरात बुधवारी ही कारवाई करण्यात आली.

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी सध्या लॉकडाऊन आहे. त्यामुळे पोलिसांकडून जिल्हाभरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. याच काळात अवैध धंदेवाले आपले उखळ पांढरे करुन घेण्याची संधी शोधत आहेत. जिल्ह्यातील फरार व पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधात असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सपोनि पाडुरंग भारती यांच्या



नेतृत्वाखाली इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेले होते. यावेळी त्यांना बनावट औषधीबाबत खबऱ्याकडून माहिती मिळाली. त्यानंतर केळी मार्केट, भंगार लाईन येथील एका दुकानावर या पथकाने छापा मारला. दुकानावर नाव किंवा परवाना नव्हता.

त्यानंतर पोलिसांनी दुकान मालकाला ताब्यात घेतले. त्यानंतर दुकानाची झडती घेतली असता, त्यात कागदी बॉक्समध्ये नशा, सेक्स वाढविण्याची आणि झोपेची औषधी आढळून आली. यावेळी ९० हजार रुपये किमतीच्या साडेसातशे बॉटल जप्त करण्यात आल्या आहेत. यावेळी दुकानमालक ज्ञानेश्वर संगेवार याला ताब्यात घेवून ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी माधवराव निमसे यांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या समक्ष पंचनामा करुन हा सर्व माल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी औषध निरीक्षक माधवराव निमसे यांच्या तक्रारीवरुन ज्ञानेश्वर संगेवार याच्याविरोधात इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.